## प्रकरण ५ वे.

## मिळालेल्या माहितीचे संकलन व पृथ:क्करण

५.१. प्रश्नावली

अ) नगरपालिकेच्या शाळामंडळाच्या प्रशासनाधिका-याची प्रश्नावली.

ब) शाळामंडळाच्या सभापतींची प्रश्नावली.

५.२. मुलाखती.

अ) शाळामंडळाच्या प्रशासनाधिका-यांच्या मुलाखती

ब) शाळामंडळाच्या सभापतींच्या मुलाखती

क) पश्चिम महाराष्ट्र नगरपालिका शाळामंडळांच्या महामंडळांच्या पदाधिका-यांची मुलाखत.

ड) नगरपालिकांच्या अध्यक्षांच्या मुलाखती.

इ) शाळामंडळाचे सभासद.

# प्रकरण ५ वे.

## मिळालेल्या माहितीचे संकलन व पृथःक्करण

मागील प्रकरणात शासन, नगरपालिका व शाळामंडळ यांच्यामध्ये असलेल्या प्रशासकीय व आर्थिक संबंधाबाबतची माहिती मिळविली. त्यांत असे दिसून आले कीं, नगरपालिका व शासन यांचे शाळामंडळावर अप्रत्यक्ष नियंत्रण मोठ्या प्रमाणात आहे. या प्रकरणात संशोधन विषयाची माहिती मिळविण्यासाठी तयार करण्यात आलेल्या साधनांद्वारा मिळविलेल्या माहितीचे संकलन करून पृथःक्करण करावयाचे आहे.

### ५·१. प्रश्नावली :

संशोधनाच्या विषयाची माहिती जमा करण्यासाठी प्रश्नावलींचा वापर केला होता. शाळामंडळाचे प्रशासनाधिकारी व शाळामंडळाचे सभापती यांच्यासाठी प्रश्नावली तयार केलेल्या होत्या. त्यावरून जमा केलेल्या माहितीचे पृथःक्करण पुढे दिले आहे.

#### अ) नगरपालिकेच्या शाळामंडळाच्या प्रशासनाधिकाऱ्यांची प्रश्नावली

नगरपालिकेच्या शाळामंडळातील प्रशासनाधिकाऱ्यांसाठी तयार करण्यात आलेल्या प्रश्नावलीत एकूण ६ भाग होते. सुरुवातीच्या भागात प्रशासनाधिकाऱ्याची वैयक्तिक माहिती विचारली होती.

(१) वैयक्तिक माहिती :

वैयक्तिक माहितीमध्ये प्रशासनाधिकाऱ्याचे वय, पूर्वीचा अनुभव, प्रशिक्षण इत्यादिबद्दल माहिती विचारली होती. ती पुढीलप्रमाणे आहे.-

तक्ता क्र.५.अ)(१)

प्रशासनाधिका-यांच्या वयोगटाप्रमाणे विभागणी दाखविणारा तक्ता

| वयोगट | ३६-४० | ४१-४५ | ४६-५० | ५१-५५ | ५६ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | २ | ५ | १ | ० | २ | १० |

वरील तक्त्यावरून असे दिसून येईल कीं, एकूण १० प्रशासनाधिका-यांपैकी ५ प्रशासनाधिकारी ४१ ते ५० या वयोगटातील आहेत व २ निवृत्तीच्या मार्गावर आहेत. ३६ ते ४० च्या वयोगटात २ प्रशासनाधिकारी असून ४६ ते ५० च्या वयोगटात १ प्रशासनाधिकारी आहे. यावरून असे दिसते कीं, जास्त प्रशासनाधिकारी ३६ ते ४५ या वयोगटातील आहेत.

तक्ता क्र.५.अ)(२)

शाळामंडळातील प्रशासनाधिका-यांचा प्रशासन अधिकारी
म्हणून असलेला अनुभव दाखविणारा तक्ता

| अनुभवाची वर्षे | १ पेक्षा कमी | १-२ | २-३ | ३-४ | ४-५ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | १ | १ | २ | ४ | २ | १० |

वरील तक्त्यावरून असे दिसून येईल कीं, एकूण १० प्रशासनाधिका-यांपैकी ६ प्रशासनाधिका-यांना ३ वर्षापेक्षा जास्त अनुभव आहे. १ प्रशासनाधिकारी ४ वर्षापेक्षा कमी अनुभव असणारे असून २ प्रशासनाधिकारी ३ वर्षांपर्यन्त अनुभव असलेले आहेत. यावरून असे दिसते कीं, तीन वर्षापेक्षा जास्त अनुभव असलेले प्रशासक अधिक आहेत.

आज प्रशासनाधिकारी म्हणून काम करीत असलेल्या प्रशासनाधिका-यांनी ह्या पदावर येण्यापूर्वी कोणत्या पदावर काम केले आहे याची माहिती पुढील तक्त्यात दिली आहे.

तक्ता क्र.५.अ)(३)

प्रशासनाधिका-यांच्या पूर्वीच्या पदाविषयी
माहिती देणारा तक्ता

| पदाचे नाव | सहशिक्षक | | विस्तार अधिकारी | ए.डी. इ.आय. | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | माध्यमिक शाळा | पदविका विद्यालय | | | |
| व्यक्ती | २ | २ | ३ | ३ | १० |

वरील तक्त्यावरून असे दिसून येईल कीं, ४ व्यक्ती अध्यापनाचे कार्य करीत होत्या व ६ व्यक्तींना पर्यवेक्षण, कार्यालयीन कामकाज, क्षेत्रीय कामकाज इ. कामाचा अनुभव होता. प्रशासनाधिका-याचे काम स्वीकारण्यापूर्वी त्यांना प्रशिक्षण मिळाले नव्हते असे सर्वांनीच नमूद केले आहे. सर्वांनीच प्रशिक्षणाची आवश्यकता असल्याची नोंद केली आहे. आपल्या विधानाच्या पुष्टीसाठी त्यांनी कारणांची यादी दिली आहे; पण प्रशिक्षणाची आवश्यकता आहे असे वाटायला लागणा-या प्रसंगांची नोंद मात्र कुणीही केलेली नाही. त्यांनी दिलेली कारणे पुढीलप्रमाणे आहेत. (कंसातील आकडे प्रतिसादकांचे आहेत).

(१) काही वेळेला तात्काळ निर्णय घ्यावे लागतात व त्यावेळी प्रशिक्षणाची आवश्यकता वाटते. (२).

(२) कार्यालयीन कामकाजाची पध्दती माहीत नसते. त्यामुळे घोटाळे होतात व कर्मचा-यांच्या शिस्तीचा प्रश्न निर्माण होतो (२).

(३) कायद्यातील अस्पष्टता स्पष्ट करण्यासाठी प्रशिक्षण हवे. (२).

(४) प्रशासनाधिका-याला बरीचशी कामे करावी लागतात. त्याविषयी तो अनभिज्ञ असतो. त्यासाठी प्रशिक्षण हवे. (२).

वरील माहितीवरून असे दिसून येईल कीं, प्रशासनाधिका-याला कोणत्याच प्रकारचे प्रशासनाचे प्रशिक्षण दिले गेले नव्हते व ते देण्याची आवश्यकता आहे.

(२) शाळामंडळाचे कार्यालय :

शाळामंडळाच्या प्रशासनाधिका-याची माहिती मिळविल्यानंतर शाळामंडळाच्या कार्यालयाची माहिती मिळविली आहे. ती पुढीलप्रमाणे आहे.-

शाळामंडळाच्या कार्यालयात एकच विभाग असून नेमलेला कर्मचारीवर्ग पुरेसा आहे अशी नोंद सर्वच प्रशासनाधिका-यांनी केलेली आहे.

नंतरच्या प्रश्नात प्रशासनाचे काम कार्यक्षमतेने करता यावे म्हणून आवश्यक असणारी सर्व परिस्थिती आहे किंवा नाही याची माहिती मिळविली आहे. या प्रश्नाला मिळालेली सर्वांची उत्तरे नकारार्थी आहेत. त्यासाठी त्यांनी पुढील कारणांची नोंद केलेली आहे.-

तक्ता क्र.५.अ)(४)

## प्रशासनाधिका-यांच्या कामात अडथळा निर्माण करणारी कारणे दाखविणारा तक्ता.

| क्र. | कारणे | प्रतिसादकांची संख्या |
|---|---|---|
| १. | पुरेशा इमारती नाहीत. .. .. | १० |
| २. | इमारती असून त्या व्यवस्थित नाहीत. .. | १० |
| ३. | पुरेशी क्रीडांगणे नाहीत. .. .. | १० |
| ४. | शैक्षणिक साधने नाहीत. .. .. | ४ |
| ५. | पालकांचे सहकार्य नाही. .. .. | -- |
| ६. | नगरपालिकेचे सहकार्य नाही. .. .. | ३ |
| ७. | शाळामंडळातील सदस्यांचा दबाव येतो. .. | ५ |
| ८. | पर्यवेक्षण करणे जमत नाही. .. .. | ५ |
| ९. | राज्य सरकार उदासीन आहे. .. .. | -- |

वरील माहितीवरून असे दिसून येते की, पालकांचे व सरकारचे सहकार्य आहे असा प्रतिसाद सर्वांचा आहे. कामात त्यांची अडवण होत नाही, पण..

(१) इमारती व क्रीडांगणे पुरेशी व व्यवस्थित नाहीत असा प्रतिसाद सर्वांनीच नोंदविला आहे.

(२) शाळामंडळातील सभासदांचा दबाव असणे व पर्यवेक्षण करता न येणे या दोन कारणांमुळे कारभारात अडवणी निर्माण होतात असे मत ५ प्रशासनाधिका-यांनी नोंदविले आहे.

(३) शैक्षणिक साधनांच्या अपुरेपणाविषयीची नोंद ४ जणांची आहे.

(४) नगरपालिकेचे सहकार्य नसणे या कारणाची नोंद तीन व्यक्तींनी केलेली आहे.

वरील माहितीवरून असे दिसून येते कीं,

(१) शाळामंडळाला सरकारचे व पालकांचे सहकार्य नेहमीच मिळते.

(२) नगरपालिकांचे सहकार्य पुरेशा प्रमाणात मिळत नाही.

(३) शाळामंडळाचे सभासदच कामात अडचणी निर्माण करतात.

(४) इमारती, क्रीडांगणे, शैक्षणिक साहित्य यांची उणीव असल्यामुळे कार्यक्षमतेने कारभार करता येत नाही.

(२) <u>शाळामंडळ</u> :

या विभागातील प्रश्न शाळामंडळातील सभासदाबद्दल होते. त्याबद्दलचा प्रतिसाद पुढीलप्रमाणे आहे. (कंसातील आकडे प्रतिसादकांचे आहेत).

शाळामंडळातील सभासदांची संख्या पुरेशी आहे. (१०). ती वाढवू नये. (१०). शाळामंडळात शिक्षकांचा प्रतिनिधी नसावा असे म्हणणाऱ्यांची संख्या दहा आहे. शाळामंडळात सरकारी सभासद असतात, त्यांचा फायदा कोणता होतो याविषयी मते नोंदवायला सांगितली होती, त्याबद्दलचा प्रतिसाद पुढीलप्रमाणे मिळाला.

तक्ता क्र.५.अ)(५)

## शाळामंडळात सरकारी सभासद असल्यामुळे होणारा फायदा दाखविणारा तक्ता

| क्र. | कारण | प्रतिसादकांची संख्या |
|---|---|---|
| १. | एखादी योजना वरून मंजूर करून आणण्यास मदत होते | १ |
| २. | योजना निर्दोषा बनविण्यास मदत होते. .. | ५ |
| ३. | कायद्याचा अर्थ व संकेत समजण्यास मदत होते. .. | ६ |
| ४. | प्रशासनाच्या परंपरा समजण्यास मदत होते .. | ८ |
| ५. | शाळामंडळातील चर्चा अर्थपूर्ण करण्यास मदत होते .. | १० |
| ६. | शासकीय धोरण कळण्यास मदत होते. .. | १० |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते कीं,

(१) शाळामंडळातील विविध प्रश्नावर चर्चा करण्यास सरकारी सभासदांची चांगली मदत होते.

(२) सरकारी सभासदांच्या उपस्थितीमुळे शासकीय धोरण कळण्यास मदत होते.

(३) प्रशासनाच्या पूर्वपरंपरा समजण्यास मदत होते.

(४) कायद्याचा क्लिष्टपणा समजण्यास मदत होते.

(५) एखादी योजना चांगल्या प्रकारे प्रस्तुत करण्यास त्यांचा हातभार लागतो.

(६) एखादे आडलेले काम वरून मंजूर करून आणण्यास त्यांचा उपयोग होतो.

यावरून असे लक्षांत येते कीं, शाळामंडळात सरकारी प्रतिनिधी असावा असे सर्वच प्रशासनाधिका-यांना वाटते.

यानंतरचा प्रश्न शाळामंडळासाठी घेण्यात येणा-या निवडणुकाबद्दल विचारला आहे. त्याबद्दल सर्वांनी असा प्रतिसाद नोंदविला आहे की सध्या अस्तित्वात असलेली निवडणूक पध्दत चांगली आहे, त्यांत बदल नको.

शाळामंडळ व नगरपालिकेतील शिक्षण समिती यांचे परस्पर संबंध जाणून घेण्यासाठी पुढचा प्रश्न विचारला होता. या प्रश्नाला असा प्रतिसाद मिळाला कीं, शाळामंडळ व शिक्षण समिती यांची एकत्र बैठक कधीच भरत नाही. त्यामध्ये विचारांची देवाण-घेवाण होत नाही.

(४) नगरपालिका व शाळामंडळ :

प्रश्नावलीच्या चौथ्या भागात नगरपालिका व शाळामंडळ यांच्यातील परस्पर संबंधाबद्दल माहिती मिळविली आहे.

एकूण १० प्रशासनाधिका-यांपैकी नऊ प्रशासनाधिका-यांनी नगरपालिकेतील शिक्षण समिती व शाळामंडळ यांचे अधिकार अगदी भिन्न व स्वतंत्र आहेत असे सांगितले आहे. फक्त एका प्रशासनाधिका-याने दोन्ही संस्थांचे अधिकार कांही बाबतीत सारखे आहेत असे म्हटले आहे व त्यामुळे एखाद्या प्रश्नाबाबत दोन्ही संस्थांचे निर्णय परस्परविरोधी आले तर राज्य सरकारकडून मार्गदर्शन मिळवून काम करता असे नमूद केले आहे.

यावरून असे दिसते कीं, नगरपालिका व शाळामंडळे यांचे अधिकार भिन्न आहेत.

याच विषयावर मिळालेली माहिती पुढीलप्रमाणे आहे. (कंसातील आकडे प्रतिसादकांची संख्या दर्शवितात.)

(१) शाळामंडळाच्या प्रशासनाधिका-याबरोबर नगरपालिकेतील शिक्षण समितीच्या चर्चा कधी होत नाही. (१०)
(२) शाळामंडळाच्या सभांना नगरपालिकेतील शिक्षण समितीचा प्रतिनिधी उपस्थित रहात नाही. (१०)
(३) नगरपालिकेतील शिक्षण समितीच्या सभेला शाळामंडळाचा प्रतिनिधी उपस्थित रहात नाही. (१०)
(४) नगरपालिकांतील शिक्षण समिती शाळामंडळाचा सल्ला कधी मागत नाही. (१०)
(५) नगरपालिकेतील शिक्षण समिती शाळामंडळाला कधीच प्रशासकीय सूचना पाठवत नाही. (१०)
(६) नगरपालिकेतील अध्यक्षांचे शाळामंडळाच्या कारभारावर मुळीच नियंत्रण नसते. (१०)
(७) शाळामंडळाने सुचविलेली योजना नगरपालिका शिक्षण समिती डावलू शकत नाही. (१०)

यावरून असे दिसते की, शाळामंडळ व नगरपालिका स्वतंत्रपणे कामे करतात.

यानंतरचा प्रश्न इमारतीबद्दल विचारला होता. त्याला मिळालेला प्रतिसाद पुढीलप्रमाणे आहे.-

प्राथमिक शाळेसाठी इमारत बांधणे, अस्तित्वात असलेल्या इमारतींची दुरुस्ती करणे व त्यांची देखभाल करणे ही कामे नगरपालिकांची आहेत.

यावरून असे दिसते की, प्राथमिक शाळेच्या इमारती, क्रीडांगणे इ. विषयीची सर्व कामे नगरपालिकेने करावयाची असतात.

शाळामंडळाचे अंदाजपत्रक नगरपालिकेला सादर करावे लागते. त्यांत दुरुस्ती करून अथवा, दुरुस्ती न करता नगरपालिका ते मंजूर करते. ही व्यवस्था कशी आहे असा प्रश्न विचारला होता. त्याला जो प्रतिसाद मिळाला तो पुढीलप्रमाणे आहे. (कंसातील आकडे प्रतिसादकांच्या संख्येचे आहेत.)

(१) नगरपालिकेने सुचविलेली दुरुस्ती अगदी मामुली स्वरुपाची असते. त्यामुळे एकूण अंदाजपत्रकाच्या धोरणात व रकमात फरक पडत नाही. (८)

(२) नगरपालिका अंदाजपत्रकात दुरुस्ती सुचविते ते नगरपालिका ही शाळामंडळापेक्षा श्रेष्ठ संस्था आहे हे दर्शविण्यासाठीच. (४)

(३) कांही वेळा अंदाजपत्रकांत तांत्रिक दोष असतो म्हणून दुरुस्ती सुचविली जाते. (२)

(४) कांही खर्चावर अनुदान मिळण्याची खात्री नसते म्हणून दुरुस्ती सुचविली जाते. (४)

वरील माहितीवरून असे लक्षांत येईल कीं, नगरपालिका आपले स्वतंत्र अस्तित्व दाखविण्याचा प्रयत्न करते. नगरपालिकेकडून शाळामंडळातील सभासद निवडले जातात, म्हणून नगरपालिका स्वत:ला श्रेष्ठ संस्था समजते. अंदाजपत्रकात सुचविलेली दुरुस्ती तांत्रिक कारणामुळे सुचविली जाते.

नगरपालिकेने आपला दृष्टिकोन बदलावा व तांत्रिक दोष निर्माण होणार नाही अशी परिस्थिती निर्माण करण्याचा प्रयत्न करावा.

नगरपालिकेचा व शाळामंडळाचा कोणत्याच प्रकारचा संबंध ठेवू नये असे मत सर्व म्हणजे दहा प्रतिसादकांनी नोंदविले आहे. त्यासाठी कायदेशीर व्यवस्था करावी अशीही प्रतिक्रिया सर्वांनी नोंदविली आहे.

वरील माहितीवरून असे दिसते की, नगरपालिकांचा व शाळामंडळाचा परस्परसंबंध कोठेच राहणार नाही अशी कायदेशीर व्यवस्था करणे जरूरीचे आहे.

(५) राज्य सरकार व शाळामंडळे

यानंतरच्या विभागात राज्य सरकार व शाळामंडळ यांच्या परस्पर-संबंधाबद्दल माहिती मिळविली. त्यावरून जे चित्र दिसू लागले ते पुढीलप्रमाणे आहे.- (कंसातील आकडे प्रतिसादकांची संख्या दर्शविणारे आहेत.)

(१) राज्य सरकारचे शाळामंडळावर संपूर्ण नियंत्रण आहे. (१०)

(२) राज्य सरकार शाळामंडळाला माहितीचा आराखडा पुरवते व मार्गदर्शन करते. (१०)

(३) राज्य सरकार ६ ते १४ या वयोगटाचे सर्व्हेक्षण करते.(८)

(४) राज्य सरकारचे शाळामंडळावर असलेल्या नियंत्रणाचा चांगला फायदा होतो. हा मुद्दा स्पष्ट करण्यासाठी एखादे उदाहरण द्यावे अशी सूचना प्रश्नावलीत केली होती. पण कुणीही उदाहरणाची नोंद केलेली नाही.

(५) राज्य सरकारने शाळा मंडळाच्या प्रशासनाधिकाऱ्याला चर्चेसाठी बोलावण्यात आलेले नाही. (१०)

(६) प्राथमिक शिक्षणाच्या नियमावलीत (१९४९) कोणत्या ठिकाणी संदिग्धता वाटते या प्रश्नाला एकानेच उत्तर दिले आणि ते पुढीलप्रमाणे आहे.-

''नियम क्रमांक ४८(अ) मध्ये सभापतीची कर्तव्ये व अधिकारांची नोंद आहे. त्यामध्ये 'सभापती प्राथमिक शिक्षणविषयक सर्वसाधारण कारभारावर देखरेख ठेवील' असे सांगितले आहे.''

त्यामधील "सर्वसाधारण कारभार" याबद्दलचा तपशील द्यावा असे त्यांचे म्हणणे आहे.

वरील माहितीवरून असे दिसते कीं, राज्यशासन व शाळामंडळ यांचे परस्पर संबंध सहकार्याचे आहेत. शाळामंडळाला राज्य सरकार मार्गदर्शन करते. व राज्य सरकारच्या नियंत्रणाचा शाळामंडळाला चांगला फायदा होतो. राज्य सरकार व शाळा-मंडळ यांत प्रत्यक्ष चर्चा कधी होत नाही.

ही चर्चा घडावी म्हणून कांही व्यवस्था करण्यात यावी.

(६) संकीर्ण :

प्रश्नावलीच्या शेवटच्या भागात कांही संकीर्ण प्रश्न विचारले होते. त्यांना मिळालेला प्रतिसाद पुढीलप्रमाणे आहे.

सक्तीच्या वयोगटातील मुलांना शाळेत पाठविले नाही म्हणून पालकावर (कलम ३५) किंवा या वयोगटातील मुलाना कामावर ठेवले म्हणून (कलम ३६) त्या मालकावर केस करण्याचा अधिकार प्रशासनाधिकाऱ्याला आहे. या अधिकाराचा उपयोग किती प्रशासनाधिकारी करतात हे जाणून घेण्यासाठी प्रश्न विचारले होते. त्यांना प्रतिसाद असा मिळाला की कोणताही प्रशासनाधिकारी या अधिकाराचा वापर करीत नाही.

यावरून असे लक्षांत येते कीं, प्रशासनाधिकारी आपले अधिकार का वापरत नाहीत याबद्दलची सर्व परिस्थिती जाणून घेण्याची आवश्यकता आहे.

यानंतर शाळामंडळातील सभासदांची वयोमर्यादा खाली आणण्याविषयीचा प्रश्न विचारला होता. त्याबद्दलचा प्रतिसाद असा होता कीं, विद्यमान वयोमर्यादा ठीक आहे.

यावरून असे लक्षांत येते कीं, शाळामंडळात निवडून येणाऱ्या समासदांच्या वयात फरक करण्याची आवश्यकता नाही.

पुढचा प्रश्न शाळामंडळातील सभासदांच्या निवडणुकीसाठीच्या पात्रते-बद्दलचा होता. त्याबद्दलचा एकमुखी प्रतिसाद असा आहे की, सभासदाला बी.एड्., बी.पी.एड्., डी.एड्. अशा पदव्यांपैकी एखादी तरी शिक्षणक्षेत्रातली पदवी असावी. सभासदामध्ये एक शास्त्र विषयाचा पदवीधर असावा अशी सूचना १ प्रशासनाधिकाऱ्यांनी केली आहे.

यावरून असे लक्षांत येते कीं, शाळामंडळासाठी निवडून देण्यात येणाऱ्या सभासदांच्या अटीमध्ये बदल करावा व त्यांत सामाजिक न्यायाच्या तत्वापेक्षा शैक्षणिक न्यायाच्या तत्वाला प्राधान्य द्यावे.

प्रश्नावलीतला शेवटचा प्रश्न प्रशासनाधिकाऱ्याला अधिकारी म्हणून आणखी कोणत्या अडचणी जाणवतात असा होता. ह्या प्रश्नाला पुढीलप्रमाणे प्रतिसाद मिळाला.- (कंसातील आकडे प्रतिसादकांची संख्या दर्शविणारे आहेत)

(१) कार्यालयात स्वतंत्र लेखापाल असावा. (७)

(२) शाळामंडळाच्या सभांचा खर्च वाढवावा.(७)

(३) खात्याच्या परीक्षा सुरू कराव्यात. (२)

(४) प्रत्येक शाळेसाठी चतुर्थश्रेणीचा नोकर नेमावा (६)

(५) काही मर्यादेपर्यन्त आयत्या वेळचा म्हणून खर्च करण्यास अधिकार द्यावेत. (५)

वरील माहितीवरून असे दिसते कीं, प्रशासनाधिकाऱ्यास कार्यालयीन, आर्थिक व व्यक्तिगत प्रगती करण्याच्या दृष्टीने काही अडचणी जाणवतात.

वरील माहितीवरून असे लक्षांत येईल कीं, काम करतांना प्रशासनाधिकाऱ्याला कोणत्याच प्रकारची अडचण येवू नये अशी व्यवस्था करणे आवश्यक आहे.

ब) शाळामंडळाच्या सभापतींची प्रश्नावली

शाळामंडळाच्या सभापतींना दिलेल्या प्रश्नावलीत एकूण ६ भाग होते. सुरुवातीच्या भागात सभापतींची वैयक्तिक माहिती विचारली होती. त्यामध्ये सभापती होण्यापूर्वी कोणत्या क्षेत्रात काम केले, वय, शिक्षण इत्यादींबद्दल विचारणा केली होती. ती पुढीलप्रमाणे आहे.-

तक्ता क्र.५.ब)(१)

शाळामंडळातील सभापतींच्या वयोगटाप्रमाणे विभागणी दाखविणारा तक्ता

| वयोगट | ४० पर्यन्त | ४१ ते ४५ | ४६ ते ५० | ५१ ते ५५ | ५६ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | - | १ | २ | ५ | २ | १० |

वरील तक्त्यावरून असे दिसून येईल की, कोणत्याही सभापतीचे वय ४० पेक्षा कमी नाही. पांच सभापतींचा वयोगट ५१ ते ५५ असा असून दोन सभापती ५६ च्या पुढील वयाचे आहेत. एका सभापतीचे वय ४५ पर्यन्त असून दोन सभापतींचे वय ५० पर्यन्त आहे.

यावरून असे दिसते कीं, वय वर्षे ४६ ते वय वर्षे ५६ या वयोगटांतील सभापतींची संख्या अधिक आहे.

तक्ता क्र.५.ब)(२)

शाळामंडळातील सभापतींची शैक्षणिक पात्रता दाखविणारा तक्ता

| शैक्षणिक पात्रता | मॅट्रिक | पदवीधर | पदव्युत्तर | एकूण |
|---|---|---|---|---|
| संख्या | ३ | १ | ६ | १० |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते कीं, विद्यापीठाची पदवी धारण केलेले व त्यापुढील शिक्षण घेतलेल्यांची संख्या ७ आहे व मॅट्रिक झालेले ३ आहेत.

वरील माहितीवरून असा निष्कर्ष काढता येतो कीं, सभापतीचे काम करणाऱ्या व्यक्तींची शैक्षणिक पात्रता चांगली आहे.

तक्ता क्र.५.ब)(२)

शाळामंडळातील सभापतींचा व्यवसाय दाखविणारा तक्ता

| व्यवसाय | शेती | वकीली | प्राध्यापकी | समाजसेवा | व्यापार | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | २ | ३ | २ | १ | १ | १ | १० |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते कीं, २ सभापती शेती व्यवसाय करतात, ३ सभापती वकीली करतात, २ सभापती अध्यापनाचे कार्य करतात, १ सभापती सर्व वेळ समाजसेवेचे काम करीत आहेत आणि १ सभापती टॅक्स सल्लागाराचे काम करीत आहेत.

वरील माहितीवरून असे लक्षात येते कीं, शाळामंडळाचे काम करणारे सभापती विविध व्यवसायातून पुढे आलेले आहेत. शाळामंडळाचे काम समाजसेवेच्या स्वरूपाचे असल्यामुळे व विनावेतन असल्यामुळे त्या त्या व्यक्तींना जीवनासाठी इतर व्यवसाय करावे लागतात.

तक्ता क्र.५.ब)(४)

शाळामंडळात सभापती होण्याआधी अन्यत्र स्वीकारलेल्या

जबाबदाऱ्या दाखविणारा तक्ता

| क्र. | जबाबदारी स्वीकारलेले क्षेत्र | प्रतिसादकांची संख्या |
|---|---|---|
| १. | नगरपालिका सदस्य ... ... | १ |
| २. | बँक संचालक ... ... | १ |
| ३. | काँग्रेस संघटना पदाधिकारी ... ... | ३ |
| ४. | सेवादल पदाधिकारी ... ... | १ |
| ५. | विद्यार्थी संघटना ... ... | १ |
| ६. | इतर ... ... ... | ३ |

वरील तक्त्यावरून असे दिसते की, आज सभापती म्हणून काम करीत असलेल्या सभापतींमध्ये पूर्वी १ नगरपिता होता. एक बँक संचालक होता. तीन काँग्रेस संघटनेचे पदाधिकारी होते तर एक सेवादलाची शाखा चालवित होता. एक विद्यार्थी संघटनेत कार्य करीत होता तर तीन सभापती कोणत्याच प्रकारच्या सामाजिक कार्यात सहभागी झालेले नव्हते.

वरील माहितीवरून असें लक्षांत येईल की, शाळामंडळाचे सभापती म्हणून काम करीत असलेल्या सात सभापतींना सामाजिक कार्याचा अनुभव होता. फक्त तीन सभापतींना सामाजिक कार्याचा अनुभव नव्हता.

शाळामंडळाच्या सभापतींची वैयक्तिक माहिती मिळविल्यानंतर शाळा-मंडळाच्या सभा, सभेची कार्यसूची ठरविण्याची पध्दती, सभासदांचे सहकार्य इत्यादि-

विद्यार्थी प्रश्न विचारले होते.

पहिला प्रश्न शाळामंडळाच्या वर्षात एकूण किती सभा होतात असा होता. त्या प्रश्नाला वर्षात एकूण १०-१२ सभा होतात असा प्रतिसाद मिळाला आहे.

यावरून असे लक्षांत येते कीं, दर महिन्याला शाळामंडळाची सभा होते.

शाळामंडळाच्या सभेची कार्यसूची कोण ठरवते हा प्रश्न नंतर विचारण्यात आला होता. हा प्रश्न विचारताना शाळामंडळाच्या कामावर नगरपालिकेचा किंवा शाळामंडळातील अधिकारीवर्गाचा दबाव कितपत आहे हे समजून घेण्याचा उद्देश होता. या प्रश्नाचे उत्तर सर्वांनीच "सभापती व प्रशासनाधिकारी एकत्र बसून सभेची कार्यसूची ठरविण्यात येते" असे दिले आहे.

वरील माहितीवरून असे लक्षांत येईल कीं, (१) सभेची कार्यसूची ठरविण्याचे अधिकार शाळामंडळाला पूर्णत: आहेत, (२) शाळामंडळातील लोकप्रतिनिधी व शासकीय नोकर यांच्यात चांगले सहकार्य आहे.

शाळामंडळावर सोपविलेले कार्य चांगल्या प्रकारे पार पाडता यावे म्हणून शाळामंडळातील इतर सभासदांची बरीचशी मदत होते असे सर्व (१०) सभापतींनी नोंदवले आहे, पण सभासद वैयक्तिक प्रकरणांत जास्त लक्ष घालतात अशी नोंद दोन सभापतींनी केली असून कायद्याची माहिती, कार्यालयीन कामकाजाची पध्दती समजून सांगितली तर त्यांचे काम उत्तम होईल अशीही नोंद केली आहे.

यावरून असे लक्षांत येईल कीं, शाळामंडळातील सर्व सभासद सभापतींना उत्तम सहकार्य करतात.

यानंतर शाळामंडळाच्या प्रशासकीय यंत्रणेत कोणती उणीव जाणवते असा प्रश्न विचारला होता. त्या प्रश्नाला पुढीलप्रमाणे प्रतिसाद मिळाला.

तक्ता क्र.५.ब)(५)

शाळामंडळाच्या प्रशासकीय यंत्रणेत जाणवणाऱ्या उणिवा दाखविणारा तक्ता

| क्र. | उणीवेचे स्वरूप | प्रतिसादकांची संख्या |
|---|---|---|
| १. | नोकरवर्ग प्रशिक्षित नसणे... ... ... | ६ |
| २. | कार्यालयीन माहिती उपलब्ध नसणे ... ... | ३ |
| ३. | पुरेसे अधिकार नसणे ... ... ... | २ |
| ४. | नोकरवर्ग पुरेसा नसणे ... ... ... | ४ |
| ५. | मार्गदर्शन न मिळणे ... .... ... | २ |
| ६. | कायदा व नियमावली स्पष्ट नसणे ... ... | ३ |
| ७. | साहित्य अपुरे असणे ... ... ... | ४ |

वरील तक्त्यावरून असे दिसते की, प्रशासनाच्या यंत्रणेत जाणवणारी सर्वात मोठी अडचण नोकरवर्ग प्रशिक्षित नसल्याची (६) आहे. त्यानंतरची दुसरी महत्वाची उणीव नोकरवर्ग पुरेसा नसणे (४) व साहित्य अपुरे असण्याची (४) आहे. तिसरी उणीव म्हणून जिचा उल्लेख करता येईल ती म्हणजे कार्यालयीन माहिती नसणे (३) व नियमावली स्पष्ट नसणे (३) या आहेत. शेवटी सभापतींना पुरेसे अधिकार नाहीत (२) व शासनाचे मार्गदर्शन मिळत नाही (२) अशाही उणिवांची नोंद केलेली दिसते.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

वरील माहितीवरून असे लक्षांत येईल कीं,

(१) कार्यालयीन नोकरवर्गास प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करावी लागेल.

(२) कार्यालयीन नोकरवर्ग पुरेसा ठेवून कार्यालयाला आवश्यक असलेली सामग्री द्यावी लागेल.

(३) प्राथमिक शिक्षणाच्या कायद्याला अनुसरून केलेली नियमावली अधिक स्पष्ट करण्याची गरज आहे.

(४) सभापतींचे अधिकार वाढवावेत.

(५) शासनाने वेळेवर मार्गदर्शन करावे.

यानंतरच्या विभागात सभापती म्हणून शाळामंडळाच्या कार्यालयीन कामकाजाची वेळ, सभेत पास झालेल्या ठरावांची अंमलबजावणी, जाणवणाऱ्या समस्या व सभापती म्हणून असलेले विशेष स्थान व अधिकार याबद्दल माहिती मिळविली.

शाळामंडळाच्या सभापतींच्या कार्यालयीन वेळेबद्दल मिळालेली माहिती पुढीलप्रमाणे आहे.

तक्ता क्र.५.ब)(६)

सभापतींच्या कार्यालयीन वेळेची माहिती देणारा तक्ता

| क्र. | देण्यात येणारा वेळ | प्रतिसादकांची संख्या |
|---|---|---|
| १. | पूर्णवेळ .. .. | -- |
| २. | अर्धवेळ .. .. | -- |
| ३. | आवश्यकतेनुसार लागेल तेवढा वेळ | ९ |
| ४. | इतर व्यवस्था .. .. | रोज एक तास, शनिवारी ४ तास. |

मिळालेल्या माहितीवरून असे दिसते कीं, शाळामंडळाच्या कामाला आवश्यकतेनुसार वेळ देणाऱ्या सभापतींची संख्या ९ आहे व एक सभापती मात्र रोज एक तास व शनिवारी ४ तास काम करतात.

वरील माहितीवरून असे लक्षांत येते कीं, शाळामंडळाच्या सभापतींचे काम मानद स्वरूपाचे असल्यामुळे त्यासाठी पूर्णवेळ वा अर्धवेळ काम करणारे सभापती नाहीत. आवश्यकतेनुसार वेळ खर्च करण्याची त्यांची तयारी आहे. एक सभापती रोजच्या रोज काम करतात.

दुसरा प्रश्न असा होता कीं, शाळामंडळात संमत झालेल्या ठरावांची अंमलबजावणी सभापती म्हणून आपणास करता येते काय आणि करता येत नसेल तर त्यासाठी कुणाची अनुमती घ्यावी लागते. या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढीलप्रमाणे आहे.

तक्ता क्र.५.ब)(७)

शाळामंडळात संमत झालेल्या ठरावांची अंमलबजावणी

करण्याबद्दल माहिती देणारा तक्ता

| क्र. | प्रतिसाद | प्रतिसादकांची संख्या |
|---|---|---|
| १. | संमत झालेल्या सर्व ठरावांची अंमलबजावणी करता येते.. | -- |
| २. | संमत झालेल्या कांही ठरावांची अंमलबजावणी करता येते | ८ |
| ३. | संमत झालेल्या कांही ठरावांची अंमलबजावणी करण्यास नगरपालिकेची संमती लागते. | -- |
| ४. | संमत झालेल्या कांही ठरावांची अंमलबजावणी करण्यास सरकारची संमती लागते. | २ |

वरील तक्त्यावरून असे दिसते कीं, शाळामंडळात संमत झालेल्या सर्वच ठरावांची अंमलबजावणी सभापतीला सभापतीच्या अधिकारात करता येत नाही. सभापती म्हणून कांही ठरावांची अंमलबजावणी सभापती करू शकतो. कांही ठरावांसाठी शासनाची संमती मिळवावी लागते. ठरावांची अंमलबजावणी करतांना नगरपालिकेचा संबंध येत नाही.

वरील माहितीवरून असे लक्षांत येते कीं,

(१) शाळामंडळात संमत झालेल्या ठरावांची अंमलबजावणी करण्यात नगरपालिकेचा संबंध असत नाही.

(२) कांही ठरावांची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाची संमती लागते.

शाळामंडळाचे सभापती म्हणून काम करतांना कोणत्या महत्वाच्या समस्या जाणवल्या या विषयीचा प्रश्न विचारला होता. त्या प्रश्नाला पुढीलप्रमाणे प्रतिसाद मिळाला. (कंसातील आकडे प्रतिसादकांची संख्या दर्शविणारे आहेत.)

(१) शिक्षकांना किंवा कर्मचाऱ्यांना, कामात कुचारपणा केला म्हणून, शिक्षा करण्याचा अधिकार नाही. (३)

(२) प्रशासनाधिकारी अकार्यक्षम असतात. (३)

(३) अनुदान वेळेवर मिळत नाही. (८)

(४) शासकीय निर्णय फार उशिरा येतात. (८)

(५) अद्यावत छापलेली नियमावली मिळत नाही. (४)

(६) शासनाचे सर्व नियम व परिपत्रके एका ठिकाणी उपलब्ध होत नाहीत.(४)

(७) कर्मचारीवर्ग प्रशिक्षित नाही. (८)

(८) शिक्षकांच्या संघटनांचा गैरवापर होतो. (२)

(९) इमारती व क्रीडांगणे पुरेशी नसतात. (१०)

(१०) खासगी इमारती दुरुस्त करता येत नाहीत. (१०)

(११) मान्य खर्चाच्या गोष्टीवरच अनुदान मिळते व मान्य खर्चाची जी यादी तयार झालेली आहे ती फार जुनाट स्वरुपाची आहे. तिच्यात दुरुस्ती होणे आवश्यक आहे. (१०)

वरील माहितीवरून असे दिसते कीं, सर्वात महत्वाची समस्या इमारतींची व क्रीडांगणांची आहे. (१०) त्यानंतरची इमारती दुरुस्त करता येत नाहीत (१०) ही तक्रार महत्वाची आहे. कर्मचारीवर्ग प्रशिक्षित नाहीत (१०) ही समस्याही मोठ्या प्रमाणात मांडली गेली आहे. त्याबरोबरच शासकीय निर्णय वेळेवर न येणे व अनुदानाची रक्कम वेळेवर न मिळणे याही तितक्याच महत्वाच्या समस्या म्हणून त्यांची नोंद केलेली आहे. प्रशासनाधिका-यांच्या कार्यक्षमतेबद्दलही २ सभापतींनी नाराजी नोंदविली आहे, तर कामचुकारपणा करणा-या कर्मचा-याविरुध्द कांही करता येत नाही अशी समस्या २ सभापतींनी मांडली आहे. दोन सभापतींनी शिक्षकांच्या संघटनेचा उल्लेख केला आहे.

वरील माहितीवरून असे लक्षांत येईल कीं, इमारती व क्रीडांगणे उपलब्ध करून देण्याबद्दल व त्यांची देखभाल आणि दुरुस्ती याबद्दल कांही व्यवस्था करणे अत्यावश्यक आहे. कर्मचारीवर्गाला प्रशिक्षित केले पाहिजे. अनुदान वेळेवर मिळावे अशी व्यवस्था केली पाहिजे. सरकारने निर्णय वेळेवर दिले पाहिजेत. कर्तव्यात कसूर करणा-या कर्मचा-यावर कोणत्यातरी स्वरुपाचा अंकुश राहील व ते कर्तव्यदक्ष राहतील अशी व्यवस्था केली पाहिजे.

याच प्रश्नविभागात असे विचारले होते कीं, विशेष समस्या कोणत्या जाणवतात. त्या प्रश्नाला पुढील प्रतिसाद मिळाला. (कंसातील आकडे प्रतिसादकांची संख्या दर्शविणारे आहेत.)

(१) शाळेच्या इमारतीच्या संरक्षणासाठी, स्वच्छतेसाठी नोकर नेमता येत नाही. (८)

(२) शाळामंडळाने, आवश्यक असलेल्या पण मान्यतेच्या यादीत नसलेल्या खर्चाचे काय करावे हे समजत नाही. (१०)

(३) नगरपालिकांना वरचेवर विनंती करूनही इमारतींची देखभाल, दुरुस्ती होत नाही, पाण्याचा नळ दिला जात नाही, विजेची सोय होत नाही. (१०)

वरील माहितीवरून असे दिसून येते की, शाळामंडळाला आर्थिक अडचणींना तोंड द्यावे लागते. शाळामंडळाने केलेल्या खर्चाला मंजुरी मिळणे कठीण जाते व नगरपालिकेचे सहकार्य प्रसंगी मिळत नाही.

यावरून असे लक्षात येते की, नोकरवर्ग नेमण्याबाबतच्या अधिकाराचा विचार व्हावा. मान्य खर्चाची यादी वाढविण्यात यावी व काही बाबतीत नगरपालिकांनी शाळामंडळाला सहकार्य दिले पाहिजे असे कायदेशीर बंधन घालावे.

शाळामंडळाचे सभापती म्हणून कोणते विशेष स्थान व अधिकार आपणाला मिळतात या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढीलप्रमाणे आहे.

शाळामंडळाच्या सभापतींना कांही अधिकार नसल्यामुळे विशेष स्थान मिळत नाही. कांही सभा-समारंभाला अध्यक्षपद भूषविणे, आलेले अनुदान वाटणे व शाळामंडळाच्या सभा चालविणे याशिवाय इतर कामे व अधिकार सभापतींना नाहीत व प्रत्यक्ष शिक्षणक्षेत्रात त्याचे स्थान उपेक्षितच राहिले आहे असा प्रतिसाद दहा सभापतींनी दिला आहे.

यावरून असे लक्षात येते की, सभापतीला काही अधिकार देऊन शहरातील प्राथमिक शिक्षणात महत्वाचे स्थान मिळवून देण्याची गरज आहे.

५.२. मुलाखती :

संशोधन विषयाची माहिती मिळविण्यासाठी संबंधित व्यक्तींच्या मुलाखती घेतल्या. त्यापैकी शाळामंडळाच्या प्रशासनाधिका-यांच्या मुलाखतींचे विवरण पुढीलप्रमाणे आहे.

अ) शाळामंडळाच्या प्रशासनाधिका-यांच्या मुलाखती :

या गटात आजी व माजी प्रशासनाधिका-यांचा समावेश केला होता. शाळामंडळाच्या विद्यमान प्रशासनाधिका-यांचा वयोगट ३५ ते ५० असून त्यांची अनुभवकक्षा १ ते ६ वर्षांची आहे. शाळामंडळाचे प्रशासनाधिकारी म्हणून काम केलेले पण सध्या सरकारी नोकरीत इतर पदावर काम करीत असलेल्या माजी प्रशासनाधिका-यांचा वयोगट ४५ ते ५५ चा असून त्यांना शाळामंडळाचे प्रशासन अधिकारी म्हणून २ ते ८ वर्षांचा अनुभव आहे.

मुलाखतीत पहिला प्रश्न इमारती व क्रीडांगणाबद्दल विचारला होता. प्राथमिक शाळांसाठी लागणा-या व शैक्षणिकदृष्टया योग्य अशा इमारती व क्रीडांगणे यांची कमतरता आहे. ही कमतरता भरून काढण्यासाठी काही योजना सुचवा अशी विनंती त्यांना केली होती. या प्रश्नाला त्यांनी पुढीलप्रमाणे उत्तरे दिली.-

शाळांना आवश्यक असलेल्या इमारती नाहीत ही वस्तुस्थिती आहे. काही इमारती नगरपालिकेच्या आहेत व काही इमारती भाडयाने घेतलेल्या आहेत. नगरपालिकांनी गतीने व आवश्यकतेनुसार इमारती बांधल्या पाहिजेत. नगरपालिका या गोष्टीकडे फारसे लक्ष देत नाहीत म्हणून इमारती कमी पडतात. अशावेळी भाडयाच्या इमारती घ्याव्या लागतात. अशा इमारतीत काही ठिकाणी खोल्या लहान असतात. त्यामुळे वर्गात गर्दीने बसावे लागते. शिक्षकांना वावरायलासुध्दा जागा रहात नाही. भाडयाच्या इमारतींची

दुरुस्ती वेळेवर होत नाही व त्यामुळे इमारत असूनही कांही वेळेस तिचा काही भाग वापरता येत नाही. याशिवाय इतरही गैरसोयी असतात. क्रीडांगण जवळ नसते. केव्हा केव्हा लहानशा प्लॉटवरच भागवून घ्यावे लागते. त्यासाठी पुढील बाबींची तरतूद करण्याची आवश्यकता आहे.

(१) शाळांसाठी आवश्यक व सोयींनी युक्त अशा इमारती बांधल्या पाहिजेत असे कायदेशीर बंधन नगरपालिकांवर असावे व शाळेसाठी इमारत भाड्याने घेण्याची प्रथा बंद करावी. एखादे वेळी इमारत भाड्याने घ्यावी लागली तर त्याबद्दलची सर्व जबाबदारी नगर-पालिकांवर टाकावी.

(२) आजच्या परिस्थितीत इमारत जरी भाड्याने घेतली तरी तिची दुरुस्ती करण्याचा अधिकार नगरपालिकेस असावा.

(३) शाळेसाठी लागणाऱ्या इमारती शाळामंडळानेच बांधाव्या असे वाटत असेल तर-

(अ) सुरवातीची कांही वर्षे शहरांत जमा होणारा शिक्षण कर शाळामंडळांकडे देण्यात यावा.

त्यानंतरच्या काळात शिक्षणकरातील काही हिस्सा शाळामंडळाला द्यावा.

दर १० वर्षांच्या अंतराने एकदा सर्व शिक्षण कर शाळामंडळाकडे देण्यात यावा त्यामुळे वाढत्या गरजा पूर्ण करण्यास मदत होईल.

(ब) शाळामंडळात इमारत बांधणे, क्रीडांगणे तयार करणे इत्यादीसाठी इंजिनिअरिंग खाते असावे. त्यांच्यातर्फे इमारत, पाणी, वीज, रस्ते, मुतारी, शाळेची बाग इत्यादी कामे व्हावीत.

(४) डेडस्टॉक ठेवण्यासाठी शाळेच्या खोल्या वापराव्या लागतात. म्हणून त्यासाठी काही नवीन व्यवस्था करण्यात यावी.

यानंतरच्या प्रश्नाद्वारे कार्यालयीन काम करतांना येणाऱ्या अडचणी कशा दूर करता येतील याबद्दल माहिती मिळविली. त्याबद्दलच्या सूचना पुढीलप्रमाणे आहेत.

(१) रिकरिंग व नॉनरिकरिंग खर्चावर असलेल्या मर्यादा या जुन्या जमान्यातील दरावर आधारित आहेत. त्यांचे पालन करणे अवघड जाते. तेव्हा याबद्दल नव्याने विचार करण्याची आवश्यकता आहे.

(२) टंकलेखन, चक्रमुद्रित यंत्र, कॅल्क्युलेटर इत्यादी साहित्य शासनाने पुरवले तर कामांतील बऱ्याच अडचणी कमी होतील.

(३) कर्मचारीवर्ग प्रशिक्षित नसल्यामुळे बऱ्याच अडचणी निर्माण होतात व कामात घोटाळा होतो. त्यासाठी कर्मचारीवर्गाला प्रशिक्षण देण्याची सोय करावी. प्रशिक्षणाच्या कालावधीत ऑफिस प्रोसिजर, हिशोबाची माहिती व इतर तांत्रिक माहिती द्यावी.

(४) विद्यार्थ्यांची संख्या २००० च्या वर गेली की शाळामंडळात दोन लेखनिक व एक लेखापाल नेमला जावा.

(५) कार्यालयांत स्वतंत्र लेखापाल असावा.

(६) शाळामंडळाच्या कार्यालयाचा किरकोळ खर्च निश्चित करून त्यावर अनुदानही स्वतंत्ररित्या द्यावे. त्यांत टपाल, फोन, वीजभाडे, स्टेशनरी, छपाई व कार्यालयात लागणाऱ्या आवश्यक गोष्टींचा समावेश असावा.

पुढील प्रश्न शाळामंडळाला द्यावयाच्या अधिकाराबद्दल होता. मुलाखतीत असे दिसून आले कीं, शाळामंडळाला पुढील अधिकार द्यावेत.

(१) प्राथमिक शिक्षकांचे गोपनीय अहवाल लिहिण्याचा अधिकार शाळामंडळाच्या प्रशासनाधिका-याला पाहिजे.

(२) प्रत्येक शाळेसाठी एक चतुर्थवर्ग नोकर नेमण्याचे अधिकार प्रशासनाधिका-याला पाहिजेत.

(३) अप्रशिक्षित शिक्षकाला प्रशिक्षणासाठी पाठविण्याचा अधिकार प्रशासनाधिका-यास असावा.

प्राथमिक शाळांतून काम करणा-या शिक्षकांविषयी त्यानंतरचा प्रश्न विचारला होता. त्याला मिळालेली माहिती पुढीलप्रमाणे आहे.-

(१) आवश्यक शिक्षकसंख्या ठरविण्यासाठी मे महिन्यात आदेश द्यावेत व जुलै महिन्याच्या अखेर विद्यार्थीसंख्येचा विचार करून त्या वर्षासाठी शिक्षकसंख्या निश्चित करण्यात यावी.

(२) अशा प्रकारे शिक्षकसंख्या ठरवितांना मुख्याध्यापक वगळून ती ठरविली जावी.

(३) खात्यात काम करीत असतांनाच महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करणा-या शिक्षकाला स्वतंत्र वेतनश्रेणीची गरज आहे.

(४) शिक्षकांचे प्रशिक्षण होणे आवश्यक आहे. त्यासाठी चर्चासत्रे, शिबिरे, कृतिसत्रे आयोजित केली गेली पाहिजेत.

(५) शिक्षकांना अध्यापनाशिवाय इतर कामे सांगितली जाऊ नयेत.

शाळामंडळापुढे उभ्या राहणाऱ्या आर्थिक पेचप्रसंगांचे निवारण करण्यासाठी काही सूचना आल्या. त्या पुढीलप्रमाणे आहेत.-

(१) शिक्षणातील नगरपालिकांचा वाटा वाढवावा.

(२) शिक्षक दिन, क्रीडा महोत्सव, आंतरशालेय स्पर्धा, शैक्षणिक शिबिरे, कृतिसत्रे, इत्यादी बाबींवर मान्य दराने अनुदान मिळावे.

(३) मागासवर्गीय व कमकुवत गटांतील मुलांची सोय करण्यासाठी प्रतिवर्षी विद्यार्थ्यामागे रु.११- खर्च करण्याची तरतूद कायद्यात आहे. ती वाढवून रु.२०१- पर्यन्त करण्यात यावी.

शासनाने करावयाच्या गोष्टींबद्दल चर्चा करतांना पुढील आकांक्षा व्यक्त करण्यात आल्या.

(१) नगरपालिकेत कर्मचारी भरण्याचा प्रसंग निर्माण झाल्यास तिला जिल्हाधिकाऱ्याची परवानगी घ्यावी लागते. त्याचप्रमाणे शाळा-मंडळातील कर्मचाऱ्याची भरती करावयाची झाल्यास मात्र संचालकांची मान्यता घ्यावी.

(२) नगरपालिकांच्या शाळा व खासगी प्राथमिक शाळा असा भेदभाव न ठेवता वेतनेतर खर्चाच्या मान्य बाबीत एकसूत्रीपणा आणावा.

(३) खाते परीक्षा सुरु करावी.

(४) शासनाने घ्यावयाचे निर्णय वेळेवर घेऊन ते वेळेवर शाळामंडळांकडे पोहोचतील अशी काळजी घ्यावी.

(५) खाजगी शाळांना परवानगी देण्यापेक्षा नगरपालिकांच्या शाळा वाढवाव्यात असे धोरण अवलंबावे.

(६) पर्यवेक्षक नेमतांना शाळांची संख्या विचारात घेऊन नेमावेत.

(७) नवीन शाळेवर शिक्षक नेमतांना लक्कर परवानगी मिळत नाही हे टाळले जावे.

(८) अधिक रकमेच्या निविदा मंजूर करण्याचा अधिकार द्यावा.

(९) सादिलवार खर्चासाठी शाळेतील शिक्षकांच्या एकूण वेतनाच्या ५ टक्के रक्कम शाळेला देण्यात यावी.

वरील सूचनाशिवाय प्रशासनाधिका-यांनी पुढील अपेक्षा व्यक्त केल्या.

(१) शाळामंडळातील प्रशासनाधिका-याला निरनिराळ्या प्रकारची २५-३० कामे करावी लागतात. जिल्हा परिषदेच्या मुख्याधिका-यावर जेवढया जबाबदा-या असतात तेवढयाच जबाबदा-या प्रशासनाधिका-यावर असतात. त्या पेलण्यासाठी त्याला प्रशिक्षण दिलेले नसते म्हणून प्रशासनाधिकारी नेमतांना प्रशिक्षण देण्याची सोय करावी. प्रशिक्षणाच्या काळात प्राथमिक शिक्षणाचा कायदा, नियम, कार्यालयीन कामकाजाच्या पध्दती, बढती, नेमणुका इ.विषयी माहिती द्यावी.

(२) सरकारी नोकरीचा ५ ते ७ वर्षाचा अनुभव असल्याशिवाय कोणत्याही व्यक्तीला प्रशासनाधिका-याची जागा देऊ नये.

(३) शाळामंडळाकडे ज्या प्रमाणात शाळा असतील त्या प्रमाणात प्रशासनाधिका-याच्या पगारात फरक असावा. साधारणपणे १० शाळांना १ प्रशासनाधिकारी नेमण्यात यावा.

(४) प्रशासनाधिका-याला द्वितीय वर्ग अधिकारी समजण्यात यावे. त्याचे नांव राजपत्रात यावे व इतर सोयी सवलती मिळाव्यात.

(५) तात्पुरते शिक्षक नेमण्याची परवानगी त्याला मिळावी.

(६) लिव्ह रिझर्व्ह शिक्षक म्हणून १०:१ प्रमाणात नेमण्याचे अधिकार त्याला द्यावेत.

ब) शाळामंडळाच्या सभापतींच्या मुलाखती :

शाळामंडळाच्या आजी आणि माजी सभापतींच्या मुलाखती घेतल्या. या सर्व सभापतींचा वयोगट ४५ ते ५५ च्या दरम्यान असून सभापती म्हणून काम केलेल्याचा अनुभव असणारी एक व्यक्ती आहे. इतरांना असा अनुभव नाही. नगरपालिका सदस्य म्हणून काम केलेली व समाजसेवा करून राजकीय पक्षात स्थान असलेली व्यक्ती सभापती म्हणून निवडून आलेली आहे. मॅट्रिक पासून पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या व्यक्ती सभापती म्हणून काम करीत असून शेती, व्यापार, नोकरी अशा विविध व्यवसायात वावरणाऱ्या आहेत.

शाळामंडळाचे सभापती म्हणून काम करीत असतांना नगरपालिकांच्या संदर्भात आलेल्या अडचणी व त्यावर करता येण्यासारखी उपाययोजना याविषयी माहिती देतांना त्यांनी पुढील विचार मांडले.

शासकीय अनुदान मिळते तेवढयावरच शिक्षणमंडळाचे तांत्रिक काम चालू असते. शासकीय शैक्षणिक उपक्रम उत्तम प्रकारे राबवणे, आपल्या क्षेत्रातील गरजांचा मागोवा घेऊन नवीन उपक्रम तयार करून त्यासाठी पैसा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी नगरपालिकेची आहे, पण या जबाबदारीच्या जाणीवेचा अभाव दिसून येवू लागला आहे. त्याचा परिणाम म्हणूनच शाळांच्या इमारतींची कमतरता व दुरावस्था, नियमबाह्य बाबीवर खर्च करणे इ. गोष्टी दिसतात. त्यासाठी पुढील सुधारणा होणे आवश्यक आहे.

(१) नगरपालिकेने प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी पत्करल्यानंतर त्यासाठी

पुरेशी आर्थिक तरतूद करून आवश्यक त्या सर्व सुविधा प्राप्त करून दिल्या तरच त्यावर शासकीय अनुदान दिले जाते.

(२) प्रतिवर्षी नगरपालिकेने आपल्या उत्पन्नाचा किमान काही टक्के सर्व प्राथमिक शिक्षणावर करण्याचे बंधन घालावे.

(३) शिक्षणकरातील काही भाग शाळामंडळाला मिळण्याची व्यवस्था करण्यात यावी.

(४) मुलांना शाळेत येण्यास प्रवृत्त करण्यासाठी निरनिराळ्या योजना राबविण्याची जबाबदारी नगरपालिकेवर टाकण्यात यावी.

(५) नगरपालिकेने शाळामंडळाचे अंदाजपत्रक योग्य दुरुस्तीसह वेळेवर मंजूर करावे व त्यानुसार रक्कम शाळामंडळाला वेळेवर उपलब्ध करून द्यावी. याचा हिशोब शाळामंडळाने ठेवावा व नगरपालिकेला सादर करावा. या हिशोबाची शासकीय तपासणी नगरपालिकेच्या तपासणीबरोबर करावी. असे करण्यामुळे शाळामंडळ हे नगरपालिकेला जबाबदार राहील व प्राथमिक शिक्षणाच्या खर्चाची अंतीम जबाबदारी नगर-पालिकांची आहे ही जाणीव नगरपालिकेला राहील.

इमारती व क्रीडांगणे यांची उणीव भरून काढण्यासाठी त्यांनी पुढील सूचना केल्या.

(१) इमारती बांधणे व क्रीडांगणे पुरविणे ही जबाबदारी शासनाने व नगरपालिकेने स्वीकारावी.

(२) इमारतींची दुरुस्ती शासनाने करावी.

(३) क्रीडांगणांची देखभाल नगरपालिकेने करावी.

(४) इमारतीवर वॉचमन नेमावा.

(५) सध्या नगररचनेचे स्वरूप पालटत आहे. गृहनिर्माण संस्था व खाजगी बिल्डर्स पुढे येऊन मोठमोठी बांधकामे करीत आहेत. अशावेळी गृहनिर्माण संस्थांचा व बिल्डर्सचा फायदा नगरपालिकेने घ्यावा. पन्नास कुटुंबांची सोय करणाऱ्याला शाळेसाठी चार खोल्या बांधून देण्याची सक्ती करावी किंवा बांधकामाच्या परवान्याची फी वाढवून पैसा उभा करावा. गृहनिर्माण संस्थेने बांधलेल्या इमारतीचा विकास, देखभाल वगैरे करण्याची जबाबदारी नगरपालिकेने घ्यावी.

कार्यालयीन कामकाजाबद्दल ज्या सूचना सभापतींकडून मिळाल्या त्या पुढीलप्रमाणे होत.-

(१) कार्यालयीन कर्मचारीवर्ग पुरेसा आहे.

(२) कार्यालयात लागणारी सामग्री अपुरी असते. उदा. टाइपरायटर, चक्रमुद्रण यंत्र, कॅल्क्युलेटर. यातील कांही गोष्टी असतात, काही नसतात.

(३) कार्यालयीन सर्व कोणता समजावा याबद्दल पुन्हा एकदा विचार केला जावा.

(४) कार्यालयीन कर्मचारीवर्ग प्रशिक्षित असला तर अधिक चांगले होईल. त्यामुळे कामाला शिस्त लागून वेळेची बचत होईल.

(५) एखाद्या समस्येवर किती दिवसात निर्णय घेतला जावा याबद्दलचे बंधन घालण्यात यावे. काही निर्णय सरकारकडून लवकर कळत नाहीत. त्यामुळे आमच्या कार्यालयातील कामावर परिणाम होतो. तेव्हा सरकारने निर्णय लवकर देण्याचे पथ्य पाळावे.

(६) याशिवाय जे शिक्षक मुलांना शिष्यवृत्ती मिळावी यासाठी काही विशेष परिश्रम घेतात त्यांना योग्य ते मार्गदर्शन व प्रशिक्षण मिळण्याची व्यवस्था करण्याची आवश्यकता वाटते.

शासनाने करावयाच्या बाबींबाबत बोलतांना पुढील विचार प्रदर्शित करण्यात आले.

(१) सन १९४७ चा कायदा आज जुना झाला आहे. तो रद्द करून नवा कायदा आणला पाहिजे व त्यासाठी शिक्षणाचा विकास व्हावा म्हणून योग्य ते धोरण स्वीकारले पाहिजे. आजच्या कायद्यात अडवाअडवी फार आहे. ती काढून टाकून संस्थांना मोकळेपणाने व जबाबदारीने काम करू द्यायची संधी कायद्याने द्यायला हवी.

(२) शासनाने आपले निर्णय त्वरित देण्याची व्यवस्था करावी.

(३) शिक्षकांना अध्यापनाखेरीज इतर कामे सांगू नयेत.

(४) दुर्बल घटकांना आवश्यक ती मदत मिळावी यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांमागे प्रतिखर्ची रु.११- ची तरतूद प्राथमिक शिक्षण कायद्यात आहे, ती वाढवून रु.२०१- पर्यन्त करावी.

(५) अनुदानास मान्य खर्चाचा विचार करून त्याबाबत उदार धोरण स्वीकारले गेले पाहिजे.

शाळामंडळापुढे असलेल्या प्रश्नाबद्दल झालेल्या चर्चेतून पुढील सूचना पुढे आल्या.

(१) शिक्षकांना घरे बांधण्यासाठी कमी व्याजाच्या दराने कर्ज मिळण्याची व्यवस्था व्हावी.

(२) इ.५ वी ते ७ वीच्या वर्गांना बाक पुरवावेत.

(३) प्राथमिक शिक्षण कायद्याच्या व नियमांच्या मराठी प्रती उपलब्ध व्हाव्यात.

(४) नगरपालिका शाळेतील व खाजगी मान्य शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेतर सेवकांना गृहविमा योजना लागू करावी.

(५) संघटनांच्या अधिवेशनास उपस्थित राहण्याचा खर्च अनुदानमान्य (पात्र) समजण्यात यावा.

(६) शाळामंडळाच्या सभासदांचे भत्ते वाढवावेत.

(७) शाळामंडळाच्या सभापतींना वाहनभत्ता मिळावा किंवा त्याच्या वाहनाची सोय करावी.

(८) संगीतशिक्षक व शारीरिक शिक्षक नेमावेत.

(९) मूक-बधीर, अंध इत्यादि अपंगांसाठी शाळा काढण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी सर्वतोपरी मदत व्हावी.

(१०) खाजगी मान्य शाळेत असते तशी परिस्थिती (मुलांना बसायला बांक, विषयवार शिक्षक, मुख्याध्यापक स्वतंत्र इ.) नगरपालिकांच्या शाळांमध्ये असावी.

क) <u>पश्चिम महाराष्ट्र नगरपालिका शाळामंडळांच्या महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांची मुलाखत</u>

पश्चिम महाराष्ट्र नगरपालिका शाळामंडळांच्या संघटना कार्यरत असून संघटनेची वार्षिक अधिवेशने होत असतात. ह्या संघटनेच्या कार्यकारिणीतील

मान्यवर सभासद श्री.शामसुंदर मुळे हे माध्यमिक शाळेत शिक्षक म्हणून काम करतात. त्यांनी बरीच वर्षे एक साप्ताहिकही चालविले होते. आज ते बार्शी नगरपालिका शाळामंडळाचे सक्रीय सभासद आहेत. त्यांनी आपले विचार स्वतंत्रपणे मांडण्याऐवजी इचलकरंजी येथे झालेल्या अधिवेशनातील ठराव दिले व यापेक्षा वेगळे काही नाही असे सांगितले.

इचलकरंजी येथे झालेल्या अधिवेशनातील (१९८८) संशोधनाच्या विषयाशी संबंधित असलेले ठराव पुढीलप्रमाणे आहेत.

(१) नगरपालिका शाळामंडळांना प्रशासकीय आर्थिक बाबींची संपूर्ण स्वायत्तता मिळेल अशी प्रभावी योजना महाराष्ट्र शासनाने विद्यमान शैक्षणिक कायद्यान्वये तसेच नवीन कायद्यान्वये करावी.(ठराव क्र.५)

(२) महाराष्ट्र शासनाने शिक्षक भरती विभागीय निवड समितीकडून व्हावी अशा अर्थाचा काढलेला आदेश त्वरित मागे घ्यावा. (ठराव क्र.६)

(३) नगरपालिका शाळामंडळास शाळांचे देखभालीसाठी वा भेटी देणेबाबत कोणतेही वाहन नाही. त्याकरिता शाळामंडळास वाहन असणे तत्यंत गरजेचे आहे. म्हणून वाहन खरेदीस व त्यावरील खर्चास मान्यता मिळावी व तो खर्च अनुदानपात्र समजावा. (ठराव क्र.७)

(४) शासनाचे वेळोवेळी निर्गमित होणारे शासकीय निर्णय व गॅझेट शाळामंडळास त्वरित मिळावे. (ठराव क्र.८)

(५) पश्चिम महाराष्ट्र शिक्षण महामंडळाच्या कार्यकारिणीच्या सभांना उपस्थित राहण्यासाठी केलेला प्रवासखर्च अनुदानासाठी पात्र होत नाही, तो मान्य व्हावा. (ठराव क्र.९)

(६) विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रम, क्रीडामहोत्सव, शिक्षक दिन, शैक्षणिक प्रदर्शने, शैक्षणिक विविध स्पर्धा, वैद्यकीय तपासणी यावरील खर्च अनुदानास पात्र धरावा.

वरील माहितीबरोबरच दि.२०-१०-१९८७ रोजी महामंडळाचे प्रतिनिधी व मान्यवर शिक्षणमंत्री यांच्यामध्ये झालेल्या चर्चेची माहिती दिली. त्यामध्ये त्यांनी पुढील आश्वासने दिल्याचे सांगितले.

(१) नगरपालिका शाळामंडळाचे अनुदानाचे धनादेश मा.सभापती, नगर-पालिका शाळामंडळ यांचे नांवे काढून नगरपालिकेमार्फत देण्यांत येतील.

(२) प्रशासनाधिकाऱ्याचे पद राजपत्रित केले जाईल.

(३) शाळेच्या इमारतीसाठी नगरपालिका उत्पन्नाचा कांही टक्के निधी राखून ठेवला जाईल.

(४) शिक्षकांचे गुप्त अहवाल मुख्याध्यापकांनी लिहावेत व त्यावर प्रशासनाधिकाऱ्यांची स्वाक्षरी असावी.

(५) मान्य खर्चाचे बाबींची पुनर्रचित व निश्चित स्वरुपाची यादी केली जाईल.

(६) शिक्षकांना महत्वाच्या कामाव्यतिरिक्त अन्य कामासाठी पाचारण करण्यात येणार नाही.

ड) <u>नगरपालिकांच्या अध्यक्षांच्या मुलाखती :</u>

नगरपालिकांचे शाळामंडळावर असलेल्या बंधनांचे स्वरुप विशद करताना नगराध्यक्षांनी असे प्रतिपादन केले कीं, शाळांमंडळ नगरपालिकेच्या सदस्यांनी

निवडून दिलेले असते. त्यादृष्टीने नगरपालिका शाळामंडळावर कांही बंधन ठेवू इच्छिते पण ही बंधने पालकत्वाच्या भूमिकेतून आलेली आहेत. नगरपालिकांकडे शाळामंडळाच्या सभेचे इतिवृत्त येते व ते सभेपुढे ठेवले जाते. त्यावर चर्चा न होता तो विषय पास केला जातो. शाळामंडळाचे बजेट नगरपालिकांकडे येते त्यावेळी नगरपालिकेच्या एकूण बजेटांत शाळामंडळासाठी किती खर्च करता येईल व किती अपेक्षित आहे हे बघितले जाते व त्याप्रमाणे फेरफार केले जातात. ही बाजू व्यावहारिक आहे. आपले अधिकार दाखविण्याची अहंकारी भूमिका त्यांत नाही. ज्या नगरपालिकांत शाळामंडळ व नगरपालिकांची मंडळी एका विचाराची आहेत तेथे अशा तक्रारी होत नाहीत. ज्या ठिकाणी तशी परिस्थिती नाही तेथे मात्र वादावादी होते असे दिसते.

नगरपालिकेतील शिक्षण समिती व शाळामंडळ यांचा कारभार स्वतंत्रपणे चालत असल्याचे मत सर्वांनी नोंदविले आहे. शाळामंडळातील 'कर्मचारी निवड समिती' वेगळी असते. त्यामध्ये नगरपालिकेचा कोणत्याच प्रकारचा भाग नसतो. शाळामंडळ प्रशासनाच्या क्षेत्रात काम करते तर शिक्षण समिती शाळामंडळाला उपकृत ठरेल अशा कार्यात रस घेते.

इमारती व क्रीडांगणे यांची असलेली कमतरता अध्यक्षांनी मान्य केली. शहरात नवीन नवीन तातडीचे प्रश्न निर्माण होतात व त्यांकडे ताबडतोब लक्ष देण्याची गरज निर्माण होते व ती कामे करीत असतांना शाळामंडळाच्या कामाकडे दुर्लक्ष होते असे त्यांनी सांगितले. याशिवाय वाढती लोकसंख्या, खेडयातून शहराकडे येणारी जनता व त्यामुळे शहरांची वाढलेली लोकसंख्या या दोन कारणांमुळे या क्षेत्रात कितीही काम केले तरी ते कमीच ठरणार आहे.

शहरातील जागांना आता खूप किंमती मिळतात. त्यामुळे इमारत किंवा ओपन प्लॉट कोणी दान देत नाही. याशिवाय धार्मिक कारणांसाठी दानधर्म केला जातो तसा शैक्षणिक कामासाठी करावा अशी भूमिका अजून लोकांत रुजलेली नाही.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

इमारती व क्रीडांगणासाठी सरकारने अधिक अनुदान दिले तर याबाबतीत कमतरता राहणार नाही.

इ) शाळामंडळाचे सभासद :

शाळामंडळाच्या सभासदांच्या मुलाखती घेतल्या होत्या. त्या मुलाखतींतून पुढे आलेली माहिती पुढीलप्रमाणे आहे.

(१) शाळामंडळातील सभासदांचा भत्ता वाढवावा. तो रु.५०/- असावा.

(२) शाळामंडळाच्या सभासदांनी शाळेस भेटी द्याव्यात अशी अपेक्षा व पध्दती आहे. म्हणून शाळांना भेटी देण्यासाठी वाहन भत्ता द्यावा.

(३) शाळामंडळाच्या सभासदाने शाळेच्या शेरेबुकात शेरा लिहिला की तो मंडळाच्या सभेत वाचून दाखविला जातो व फाईल केला जातो. तसे न करता त्यावर योग्य ती कृती केली जावी.

(४) प्राथमिक शिक्षण नियम (१९४९) मध्ये शाळामंडळाची कामे कोणती याची नोंद नाही. ती नोंद करावी.

(५) प्राथमिक शिक्षण कायदा (१९४७) व नियमावली (१९४९) यांची मराठी प्रत ताबडतोब उपलब्ध व्हावी.

संशोधन विषयाबद्दल मिळविलेली माहिती अनुभवी व अभ्यासू व्यक्तींकडून मिळविली गेली असल्यामुळे ती अत्यंत महत्वाची आहे. या माहितीच्या केलेल्या संकलन-विश्लेषणातून शहरातील प्राथमिक शिक्षणाच्या संदर्भात सरकार, नगरपालिका व शाळामंडळ यांचे संबंध कसे आहेत व त्यामध्ये काम करणाऱ्या लोकांच्या अडचणी कोणत्या आहेत हे कळण्यास मदत झाली आहे. त्याबरोबर शहरातील नगरपालिका क्षेत्रातील प्राथमिक शिक्षणाची वाटचाल गतीने व निर्वेधपणे होण्यास कोणत्या गोष्टींचा अवलंब केला पाहिजे याबद्दलही मार्गदर्शन मिळाले आहे.